# प्रेसनोट दिनांक 29/07/2020

## वेगवेगळ्या गुन्हयातील चौघे जेरबंद - देहूरोड गुन्हे प्रकटीकरणाची मोठी कारवाई

### 1) संघटित गुन्हेगारी टोळीतील फरारी जेरबंद

देहूरोड पोलीस ठाणे हद्दीतील संघटित गुन्हेगारी टोळीतील वर्षभरापासून फरार असलेला सुरेश मुन्ना अवचिते ( वय रा. गांधिनगर , देहूरोड ) याला देहूरोड पोलिस ठाण्याच्या गुन्हे प्रकटीकरणाचे पोलीस शिपाई सचिन शेजाळ यांना गुप्त बातमीदाराकडून माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी सापळा रचून त्याला अटक केली आहे. त्यावर प्राणघातक हल्ला,घातक शस्त्राने मारहाण,मारामाऱ्या सारखे गुन्हे दाखल आहेत. याप्रकरणी अधिक तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रसाद गज्जेवार करीत आहे.

### २) महिलेचा विनयभंग करणाऱ्या तडीपारास अटक

देहूरोड पोलिस ठाण्याच्या हद्दीतून तडीपार केलेला तडीपार हद्दीत येऊन एका महीलेचा विनयभंग केल्या नंतर फरार असलेल्या तडीपाराला गुन्हे प्रकटीकरणाच्या पोलिसांनी अटक केली आहे .डब्बू ऊर्फ हुसेन यामिन शेख। ( वय 26 रा पारशी चाळ देहूरोड ) असे अटक केलेल्या तडीपाराचे नाव आहे .स्थानिक गुन्हे प्रकटीकरणाचे सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रसाद गज्जेवार यांच्याकडून मिळालेल्या माहितीनुसार अनेक गुन्ह्यांमुळे डब्बू शेख याला पोलिसांनी तडीपार केला होता. तडीपार असतानाही तो देहूरोड हद्दीत फिरत असल्याची माहिती मिळाल्यानंतर त्याला दोन दिवसांपूर्वीच अटक करून न्यायालयात हजर केले होते मात्र न्यायालयाच्या आदेशानंतरही तो फिरत असताना त्याने एका महिलेचा विनयभंग केला होता. या प्रकरणी देहूरोड पोलीस ठाण्यामध्ये 562/ 2020 भादवि कलम 354 ,506, आर्म ॲक्ट 4 ( 25 ) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता .तो पारशी चाळ येथे येणार असल्याची माहिती पोलीस शिपाई सुमित मोरे यांना मिळाल्यानंतर पोलीस निरीक्षक मनीष कल्याणकर व पांडुरंग गोफणे यांच्या मार्गदर्शनात गुन्हे प्रकटीकरणाचे पोलीस उपनिरीक्षक अशोक जगताप ,पोलीस नाईक प्रशांत पवार ,पोलीस शिपाई सचिन शेजाळ, सुमित मोरे आदीनी सापळा रचून त्याला अटक केली आहे.

### ३) दोघे लुटारूंना शिताफिने जेरबंद - गुन्हे प्रकटीकराची कारवाई

एका ज्येष्ठ नागरिकाला मारहाण करून त्याची सोन्याची चेन आणि मोबाईल लुटणाऱ्या दोघांला देहूरोड गुन्हे प्रकटीकरण पोलिसांनी अटक केली आहे.

विनायक भारत कोळी (वय 26, रा. वाघमारे बिल्डींग मध्ये ,कोहली गॅस पाठीमागे , देहूरोड ) तर गण्या उर्फ गणेश महावीर भुंबक वय 23, रा. विठ्ठल मंदिरासमोर , किन्हई गाव,देहूरोड ) असे अटक केलेल्या लूटरूची नावे आहेत.